# उल्हासनगर महानगरपालिका



## आपत्ती व्यवस्थापन

## कृती आराखडा – २०२०

**ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION**

# उल्हासनगर महानगरपालिका

फॅक्स् नं : ०२५१ २७२०१०४ विस्तार क्रं २०४ दुरध्वनी - २७२०१९६

जा.क्र.उमपा/आ.व्य्.वि./ २२ /२०२०
दिनांक : २३/०५/२०२०

प्रति,
मा.जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय,
जिल्हा ठाणे

**विषय :- उल्हासनगर महापालिका नैसर्गिक आपत्ती क्रती आराखडा - २०२०**
**संदर्भ :- आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडील दिनांक :१९ /०५/२०२० रोजीचे पत्र.**

महोदय,

नैसर्गिक आपत्ती व त्यावर करावयाची उपाययोजना संदर्भात या कार्यालयाने तयार केलेल्या कृती आराखडयाची प्रत या पत्रासोबत माहितीसाठी पाठवित आहेत.

आपला,

(समीर उन्हाळे)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## नैसर्गिक आपत्ती क़ती आराखडा २०२०

ठाणे जिल्हयामध्ये साधारणत: जुन महिन्याच्या पहिल्या आठवडयात पर्जन्यमानास सुरुवात होते व सदरचा पावसाळी मौसम साधारणत: जुन ते ऑक्टोबर या कालावधीत कार्यरत राहतो. या कालावधीत अतिव्रष्टीमुळे उदभवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीच्या निवारणार्थ् उल्हासनगर महानगरपालिकेच्या हददीमध्ये महापालिकेची यंत्रणा सज्ज असणे आवश्यक आहे. यावर्षी पावसाळा जून पूर्वीच सुरु होणार असल्याचे सद्याच्या पावसाळी मौसमावरुन दिसून येते. त्यासाठी सदरचा नैसर्गिक क़ती आराखडा-२०२० साधारणत: दिनांक ०१ जून २०२० ते १५ ऑक्टोबर २०२० या कालावधीसाठी तयार करण्यात आलेला आहे तसेच या कालावधीत उल्हासनगर महापालिकेमध्ये सुरक्षिततेच्या कारणास्तव मा.आयुक्त यांचे नियंत्रणाखाली श्री. मदन सोंडे, उपआयुक्त (आव्यवि) यांचे पर्यवेक्षणाखाली आपतकालीन नियंत्रण कक्ष आहे. मौसमी पावसाळी हंगामामध्ये होणाऱ्या अतिवृष्टीमुळे जिवीत व वित्त हानी टाळण्यासाठी दोन टप्पामध्ये कार्यवाही करणे अपेक्षित असते.

१. पावसाळा सुरु होण्यापूर्वीची कार्यवाही
२. पावसाळा सुरु झाल्यानंतरची कार्यवाही

सदरच्या दोन्ही टप्प्याच्या वेळी महानगरपालिकेतील विविध विभागांनी पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या सदर क़ती आराखडयाद्वारे ठरवून देण्यात येत आहे.

**टप्पा क्रमांक १**

**पावसाळयापुर्वी करावयाची कार्यवाही :-**

**१) स्वच्छता विभाग :-**

महानगरपालिकेच्या हददीमधील असणारे सर्व मोठे नाले यांची ०५ प्रोकलेन मशीन, ०३ जेसीबी मशिन, इत्यादी यंत्राच्यामार्फत पावसाळयापुर्वी सर्व साफसफाई करुन घेणेचे काम सुरु आहे. तसेच अन्य छोटया नाल्यामध्ये असणारा गाळ व कचरा अतिरिक्त मजुर लावून पुर्णपणे साफ करुन घेणे बाबतची कार्यवाही सुरु आहे.

सदरचे काम पावसाळयापुर्वी उप-आयुक्त(आरोग्य) हे त्यांच्या आखत्यारितील आरोग्य विभागाच्या कर्मचारी/अधिकारी यांचेमार्फत करुन घेतील व झालेल्या कामाचा वेळोवेळी आढावा घेवून मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना अहवाल सादर करतील.

**२) सार्वजनिक बांधकाम विभाग व अतिक्रमण नियंत्रण विभाग :-**

महानगरपालिका हददीमध्ये जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती/बांधकामे यांचे सर्वेक्षण पावसाळा सुरु होण्यापुर्वी करणे आवश्यक आहे व अशी मोडकळीस आलेली जी बांधकामे

अतिव्रष्टीमुळे पडण्याची शक्यता आहे व ज्यामुळे जिवीत व वित्त हानी होण्याची संभावना आहे. अशा सर्व इमारतीमधील रहिवाशांना इमारत/बांधकाम खाली करण्याची नोटीस (वास्तव्य न करण्याबाबत) देवून, संबंधित सहा. आयुक्त/प्रभाग अधिकाऱ्यांचे सहाय्याने सदरच्या इमारतीमधील रहिवाशांचे वास्तव्य खाली करुन घेणे आवश्यक आहे. तसेच आवश्यकता भासल्यास अशा इमारती पाडून टाकण्याची कायदेशीर कार्यवाही सुधदा करणे आवश्यक आहे. मोडकळीस आलेल्या इमारतीचे सर्वेक्षण व त्यांना रहिवास बंद करण्याच्या नोटिसा शहर अभियंता, सा.बां.विभाग यांनी देण्यात याव्यात. इमारतीमधील वास्तव्याखाली करण्यासाठी संबंधित सहा. आयुक्त/प्रभाग अधिकारी हे त्यांना आवश्यक ते सहकार्य करतील. मोडकळीस आलेल्या इमारती पाडून टाकण्याची आवश्यकता असल्यास ती कार्यवाही संबंधित सहा. आयुक्त/प्रभाग अधिकारी हे करतील.

याशिवाय महानगरपालिका हददीमधील नदी व नाल्यांच्या मार्गात झालेल्या अतिक्रमणामुळे अतिव्रष्टीच्या कालावधीत येणाऱ्या पुरामुळे होणारी जिवीत व वित्तहानी टाळण्यासाठी नदी व नाल्याच्या प्रवाह मार्गात असणारी अतिक्रमणे दुर करणेबाबत संबंधित प्रभाग अधिकारी यांनी त्वरीत कार्यवाही करावी.

३) <u>विद्युत विभाग :-</u>

मौसमी पावसाळी हंगामात अति वेगाने वाहणारे वार व मुसळधार पर्जन्यव्रष्टी यामुळे पूर्वीच वाकलेले विजेचे खांब, लोंबकळणाऱ्या विजेच्या तारा पडुन होणारे अपघात टाळण्यासाठी अशा बाबी पावसाळयापुर्वीच सर्वेक्षण करुन त्यावर कार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी ठोस उपाययोजना कराव्यात.

४) <u>पाणीपुरवठा विभाग :-</u>

पावसाळयाच्या कालावधीत साठलेले दुषीत पाणी मुख्या जलवाहिनीमध्ये जोडांचे ठिकाणी (जेथे गळती आहे) घुसुन् पिण्याच्या पाण्यामधुन लोकांपर्यंत दुषीत पाणी जाण्याची शक्यता असते. ज्यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा मुख्य जलवाहिन्यामधील असणारी गळती पावसाळयापुर्वी थांबविणेबाबत कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी कार्यवाही करावी.

५) <u>आरोग्य विभाग :-</u>

पावसाळयाच्या कालावधीत उदभवणाऱ्या साथींच्या रोगांचे नियत्रण करणेसाठी आवश्यक असणारा औषधसाठा, जंतुनाशके, इत्यादी उपलब्ध करुन घेण्याबाबत वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी कार्यवाही करावी. यावर्षी शहरात साथीच्या रोगांच्या छोटया-छोटया घडल्याचे निदर्शनास आले आहे. साथींच्या रोग्यांबाबत प्राथमिक प्रतिबंधक उपायासाठी जनतेमध्ये जाग़ती निर्माण करावी. यासाठी सर्व प्रसार माध्यमांचा उपयोग करावा.

६) वरील अत्यावश्यक सेवा पुरविणाऱ्या विभागांनी सदर कालावधीसाठी दक्षता पथक निर्माण करावे व त्यांना कामे नेमून द्यावीत.

७) सर्व विभागांनी नैसर्गिक आपत्तीच्या निवाराणार्थ लागणाऱ्या सर्व प्रकारच्या साहित्यांची मागणी भांडार विभागाकडे करुन सदर साहित्य वेळेवर उपलब्ध् करुन घ्यावे. ही जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांची राहील.

**टप्पा क्र. — २**

**पावसाळा कालावधीत करावयाची कार्यवाही**

**१) नैसर्गिक आपत्ती नियंत्रण कक्ष :-**

उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये मौसमी पावसाळी हंगामात उदभणाऱ्या नैसर्गिक आपत्तीस तोंड देण्यासाठी २४ तास नियंत्रण कक्ष दिनांक ५ जून, २०२० पासून कार्यान्वीत करण्यात येत असुन त्याचा दुरध्वनी क्रमांक आहे. २७२०१४३ व २७२०१४९

नियंत्रण कक्षामध्ये तीन पाळयांमध्ये कामकाज चालणार असुन प्रत्येक पाळीमध्ये एक नियंत्रण कक्ष, पर्यवेक्षकासह १० कर्मचारी कार्यान्वित असतील. त्यांना आवश्यक असणारे फावडे, पहार, घमेले, दोरखंड, घन, टिकाव, कुऱ्हाडी, बॅटरी, कोयते इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच नियंत्रण कक्षासाठी वाहनचालकासह एक वाहन पुरविण्यात आलेले आहे.

नियंत्रण कक्षावर कार्यरत पर्यवेक्षकाने महानगरपालिका हददीमध्ये दूरध्वनीवरुन येणारे प्रत्येक संदेश यांची नोंद नोंदवहीत करुन त्यावर तातडीने उपाययोजना करणेसाठी आपल्याला दिलेल्या यंत्रणेचा वापर करावयाचा आहे. जनतेला सावधानतेचा इशारा देण्याचे कामसुध्दा नियंत्रण कक्षामार्फत होईल नियंत्रण कक्ष व अग्निशामक दल हे दोन्ही आवश्यकतेनुसार समन्वयाने काम करतील. नियंत्रण कक्षावरती नियंत्रण म्हणून उप आयुक्त (आरोग्य) हे कामकाज पाहतील.

**२) स्वच्छता विभाग :-**

अतिव्रष्टीमुळे वाहुन येणारा गाळ व कचरा यामुळे नाले तुंबुन आजुबाजुच्या परिसरात पाणी शिरुन होणारे नुकसान टाळण्यासाठी असे तुंबलेले नाले त्वरीत मोकळे करुन पाण्याच्या व्यवस्थित निचरा होईल. यासाठी तुंबलेले नाले त्वरीत साफ करण्याची वेळोवेळी कार्यवाही स्वच्छता विभागाचे उप-आयुक्त् यांचे नियंत्रणाखाली करणेत येईल. त्यासाठी सर्व स्वच्छता निरीक्षक यांनी आपले कार्यक्षेत्रात दक्ष राहणे व वेळोवेळी पाहणी करणे आवश्यक राहील.

**३) सार्वजनिक बांधकाम विभाग :-**

अतिव्रष्टीच्या कालावधीत निर्माण होणाऱ्या पुर परिस्थितीमुळे वाहुन जाणारे पुल, रस्ते, इत्यांदीमुळे वाहतुक बंद होते. तसेच अपघात होण्याची शक्यता वाढते. अशा बाबी पूर्व पदावर

आणण्यासाठी त्वरीत उपाययोजना उप अभियंता (सा.बां.वि) हे करतील व सार्वजनिक वाहतूक पुर्वपदावर येण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करतील. त्यासाठी शहर अभियंता स्थानिक पोलिस, वाहतुक पोलिस, रेल्वे प्राधिकारी, अग्निशमन दल, नियंत्रण कक्ष व अतिक्रमण नियंत्रण विभाग यांच्याशी समन्वय ठेवतील.

**४) <u>पाणीपुरवठा विभाग :-</u>**

पुरामुळे वाहुन जाणाऱ्या जलवाहिन्या त्वरीत पुर्वस्थितीत कार्यान्वित करुन पावसाळी हंगामात कृत्रिम पाणीटंचाई निर्माण होणार नाही व जनसामान्यावर त्याचा परिणाम होणार नाही याकडे कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) हे लक्ष ठेवतील. तसेच वाहुन गेलेल्या जलवाहिन्या किंवा गळती सुरु झालेल्या जलवाहिन्या यामधुन दुषीत पाणीपुरवठा जनतेमध्ये होणार नाही याकडे ते दक्ष देतील व योग्य त्या उपाययोजना तातडीने कार्यान्वित करतील.

**५) <u>अतिक्रमण नियंत्रण विभाग :-</u>**

अतिवृष्टीमुळे कोसळणारी बांधकामे, घरे, इमारती यामधील लोक तातडीने सुरक्षित स्थळी पोहचवणे, पडलेल्या इमारती/बांधकामे, घरे येथील मलबा उचलणे, अर्धवट पडलेल्या इमारतीमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी उर्वरीत राहिलेला भाग पाडुन टाकणे इत्यादी बाबतची आवश्यक ती कार्यवाही संबंधित सहा. आयुक्त/प्रभाग अधिकारी हे करतील. त्यासाठी उप-आयुक्त (अ.बा.नि.वि), शहर अभियंता, कार्यकारी अभियंता (विद्युत), स्थानिक पोलिस अधिकारी, वैद्यकिय अधिकारी, शासकिय रुग्णालय, वैद्यकिय अधिकारी महानगरपालिका, अग्निशामक दल व नियंत्रण कक्ष यांचेशी समन्वय ठेवतील.

**६) <u>विद्युत विभाग :-</u>**

मौसमी पावसाळी हंगामात अतिवृष्टी बरोबरच वादळी वारे अशा दोन्ही प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीमुळे विजेचे खांब कोसळणे, विद्युत तारा तुटणे, इत्यादी बाबी घडत असतात व अशा विद्युत प्रवाह चालू असताना रस्तयावर किंवा पाण्यामध्ये पडलेल्या तारांमुळे/खांबामुळे विद्युत धक्का बसून अपघात घडण्याची शक्यता असते. तसेच शॉर्टसर्किट झाल्यामुळे आग लागण्याची संभाव्य शक्यता असते. अशावेळी आवश्यकतेनुसार विद्युतप्रवाह खंडीत करणे जिवीत हानी टाळण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करणे आवश्यक असते. तसेच पुन्हा सुरळीतरित्या विद्युत यंत्रणा कार्यान्वित करणे हेही आवश्यक ठरते. सदरच्या सर्व बाबींवर कार्यकारी अभियंता(विद्युत) हे नियंत्रण ठेवतील. त्यासाठी त्यांनी नियंत्रण कक्ष व अग्निशामक दल यांचेशी समन्वय ठेवणे आवश्यक आहे.

**७) <u>अग्निशमन दल :-</u>**

उल्हासनगर महानगरपालिका हददीमध्ये कॅम्प क्र. १,२,३ साठी महानगरपालिका कार्यालय, प्रशासकीय इमारत उल्हासनगर -३ येथे एक अग्निशामक दल २४ तास कार्यान्वित असेल त्यांचा दुरध्वनी क्रमांक २७२०१३१,२७२०१३२ असा आहे व कॅम्प क्रमांक ४ व ५ साठी नेताजी चौक,

उल्हासनगर-५ येथील अग्निशमन दल २४ तास कार्यान्वित असेल त्यांचा दुरध्वनी क्र. २७२०१३३ असा आहे.

अतिव्रष्टीच्या कालावधीत निर्माण होणाऱ्या पुरपरिस्थितीला तोंड देताना अग्निशामक दलाचे जवान पूराच्या पाण्यात अडकलेले/वाहून जाणारे इसम यांना बाहेर काढणे पुरजन्य परिस्थिती ज्या भागात निर्माण झालेली असेल तेथील नागरीकांना सुरक्षित स्थळी हलवणे, वादळामुळे पडलेली झाडे, विद्युत खांब, दुरध्वनी खांब यांना सुरक्षिततेच्या द्रष्टीने त्वरीत हटवणे व पुरामुळे व आगीमुळे दगावलेल्या किंवा जखमी झालेल्या आपदग्रस्तांना आवश्यकतेनुसार स्थानिक पोलिसांच्या मदतीने शासकीय रुग्णालयात दाखल करणे, इत्यादी बाबत कार्यवाही करतील. सदरची कार्यवाही करणेसाठी मुख्य अग्निशमन अधिकारी हे स्थानिक पोलिस अधिकारी, नियंत्रण कक्ष, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता(विद्युत), उप-आयुक्त(अबांनिवि), उप-आयुक्त(भांडार) यांचेशी समन्वय ठेवतील.

८) **आरोग्य विभाग :-**

अतिव्रष्टीमुळे निर्माण झालेल्या पुर परिस्थतीतुन अनेक वेळा आपतग्रस्तांना सुरक्षित स्थळी पाठवावे लागते. अशा सुरक्षित स्थळी पाठविण्यात आलेल्या नागरिकांना पुरविण्यात येणारे पाणी, अन्न, दुध, बिस्कीटे, ब्रेड इत्यादी मुळे विषबाधा होणार नाही. दुषीत पाण्याचा पुरवठा होणार नाही. त्यांना योग्य तो औषधोपचार पुरवला जाईल याकडे वैदयकीय आरोग्य अधिकारी हे लक्ष देतील. पुरामध्ये वाहुन गेलेल्या लोकांना बाहेर काढले नंतर त्यांना औषधोपचाराची आवश्यकता भासल्यास किंवा त्यांना रुग्णालयात भरती करणे आवश्यक असल्यास वैदयकिय आरोग्य अधिकारी हे शासकीय रुग्णालय व स्थानिक पोलिस अधिकारी यांना त्यासाठी मदत करतील.

पुर परिस्थिती ओसरलयानंतर ज्या भागात पुराचे पाणी येऊन गेले आहे अशा भागात साथीचे रोग पसरण्याची दाट शक्यता असते. त्यासाठी अशा भागात जंतुनाशक फवारणी करणे, लसीकरण मोहीम हाती घेणे, औषध उपचार पुरवणे. इत्यादी वैदयकीय बाबी वैदयकीय आरोग्य अधिकारी तातडीने हाती घेतील.

९) **भांडार विभाग :-**

पुर परिस्थितीशी मुकाबला करण्यासाठी नियंत्रण कक्ष, आरोग्य विभाग, स्वच्छता विभाग, अग्निशमन विभाग इत्यादी यांना आवश्यक असणारे सर्व साहित्य पुरविण्याची कार्यवाही उप-आयुक्त (भांडार) हे करतील.

१०) **प्रभाग क्षेत्र कार्यालय :-**

प्रत्येक प्रभाग अधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रभाग क्षेत्रांमध्ये उदभवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचे निवारण त्यांच्या नियंत्रणाखली असलेल्या कर्मचारी वर्गाकडून करावयाचे आहे. रात्र पाळीकरिता प्रत्येक सहा. आयुक्त/प्रभाग अधिकाऱ्यांचे एक स्वतंत्र पथक कार्यरत ठेवावयाचे असुन

रात्रीच्यावेळी, सदर पथकाने काम करावयाचे आहे. नैसर्गिक आपत्ती नियंत्रणासाठी लागणारे आवश्यक ते साहित्य प्रत्येक सहा. आयुक्त/प्रभाग अधिकाऱ्यांने प्रभाग कार्यालय नियंत्रण कक्षात उपलब्ध ठेवावयाचे आहे.

सर्व विभाग हे आपआपल्या विभागाची जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे व जबाबदारीने पार पाडतील याची सर्वांनी दक्षता घ्यावी व येणाऱ्या संभाव्य पुर परिस्थितिशी मुकाबला करण्यात यशस्वी व्हावे.

वरीलप्रमाणे महापालिका स्तरावर पावसाळयापूर्वी व पावसाळयानंतर कार्यवाही करण्याच्या संदर्भात बैठक आयोजित करण्यात येऊन सर्व विभागप्रमुखांना सुचना देण्यात येत आहेत.

(समीर उन्हाळे)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

# नैसर्गिक आपत्तीसंबधी महत्वाचे दुरध्वनी क्रंमाक

| अ.क्रं | अधिकारी /कार्यालयाचे नाव | कार्यालय |
|---|---|---|
| १ | नैसर्गिक आपत्ती निवारण केंद्र | २७७२०१४३/२७२०१४९ |
| २ | मा. आयुक्त्, उल्हासनगर महानगरपालिका | २७२०१०५ |
| ३ | अतिरिक्त् आयुक्त् | २७२०१६५ |
| ४ | उप-आयुक्त् (मुख्यालय) | २७२०१२६ |
| ५ | उप-आयुक्त् (आरोग्य्) | २७२०१३४ |
| ६ | वैद्यकीय आरोग्य् अधिकारी | २७२०१०८ |
| ७ | उप-आयुक्त्, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग | २७२०१३४ |
| ८ | शहर अभियंता | २७७२१००४ |
| ९ | कार्यकारी अभियंता सा. बां. वि. | २७२०१३६ |
| १० | कार्यकारी अभियंता (विद्युत) | २७२०१९७ |
| ११ | कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) | २७२०१४२ |
| १२ | वैद्यकीय अधिकारी | २७२०१३७ |
| १३ | अग्शिमन दल महापालिका प्रशासकीय इमारत कॅम्प् नं ३ | २७२०१३१/ २७२०१३२ |
| १४ | अग्निशमन दल नेताजी चौक | २७२०१३३ |
| १५ | पोलीस उपायुक्त् परीमंडळ ४ उल्हासनगर (DCP) | २७०९००० |
| १६ | सहा. पोलीस आयुक्त् पोलीस स्टेशन उल्हासनगर १ (ACP) | २५६९०७६ |
| १७ | सेंट्रल पोलिस स्टेशन कॅम्प् नं ३ | २७०६९०० |
| १८ | विठ्ठलवाडी पोलिस स्टेशन उल्हासनगर ४ | २५८२००९ |
| १९ | हिललाईन पोलिस स्टेशन उल्हासनगर ५ | २५२०१०२ |
| २० | उपविभागीय अधिकारी उल्हासनगर ३ | २५६७४०७/२५६८६८५ |
| २१ | तहसिलदार उल्हासनगर | २५३०५६८ |
| २२ | शासकीय मध्य्वर्ती रुग्णालय | २७०८७३०/२७०९४३२ |
| २३ | शासकीय प्रसुती रुग्णालय उल्हासनगर ४ | २५८४९०३ |
| | **म.रा.वि.म.उप विभागीय कार्यालय बस स्टॉप उल्हासनगर - १** | |
| २४ | महाराष्ट्र राज्य् विद्युत मंडळ उप विभाग क्रं १ सहा. अभियंता उल्हासनगर -१ मोहने सेक्शन | २७२०२५३/९२२५८३३९८२ |
| २५ | कार्यकारी अभियंता (म. रा.वि.म.) साईबाबा मंदीर उल्हासनगर १,२,३ | ८८७९६२६८८८ |
| २६ | कार्यकारी अभियंता (म. रा.वि.म.)अंबरनाथ मोरीवली कॅम्प् नं ४ व ५ | ८८७९६२८३३३ |
| २७ | अति. कार्यकारी अभियंता (म. रा.वि.म.) | ८८७९६२७४७७ |
| २८ | सहा. अभियंता शहाड | ८८७९८६२७४६३ |
| २९ | सहा. अभियंता धोबीघाट एरीया | ८८७९६२७४७८ |
| | **म.रा.वि.म.उप विभागीय कार्यालय २ साईबाबा मंदीर जवळ उल्हासनगर - ३** | |
| ३० | अति. कार्यकारी अभियंता (म. रा.वि.म.) | ८८७९६२७४८४ |

| | | |
|---|---|---|
| ३१ | सहा. अभियंता नेहरू चौक एरीया | ८८७९६२७५५३ |
| ३२ | सहा. अभियंता खेमानी एरीया | ८८७९६२७५४२ |
| ३३ | सहा. अभियंता साईबाबा मंदीर एरीया | ८८७९६२७५६९ |
| **म.रा.वि.म.उप विभागीय कार्यालय ३ सेक्शन १७ उल्हासनगर - ३** | | |
| ३४ | अति. कार्यकारी अभियंता (म. रा.वि.म.) | ८८७९६२७४९३ |
| ३५ | सहा. अभियंता म्युनिसिपल कॉर्पोरेशन एरीया उल्हासनगर - ३ | ८८७९६२७५१५ |
| ३५ | सहा. अभियंता पवई चौक एरिया उल्हासनगर- ३ | ८८७९६२७५८२ |
| ३७ | सहा. अभियंता उल्हास स्टेशन एरिया उल्हासनगर- ३ | ८८७९६२७५९४ |
| **म.रा.वि.म.उप विभागीय कार्यालय ४ मानेरे गाव उल्हासनगर - ४** | | |
| ३८ | अति. कार्यकारी अभियंता (म. रा.वि.म.) | ८८७९६२७६२८ |
| ३९ | सहा. अभियंता उल्हासनगर - ४ | ८३५५८२६७७८ |
| ४० | सहा. अभियंता | ८८७९६२७६३३ |
| ४१ | सहा. अभियंता | ९९२०७४८५४३ |
| **म.रा.वि.म.उप विभागीय कार्यालय ५ आशेळे गाव उल्हासनगर - ४** | | |
| ४२ | अति. कार्यकारी अभियंता (म. रा.वि.म.) | ८८७९६२७६७१ |
| ४३ | सहा. अभियंता उल्हासनगर - ४ | ८८७९६२७६७४ |
| ४४ | सहा. अभियंता | ९५०३४०७९७१ |
| ४५ | सहा. अभियंता | ८८७९६२७६७६ |
| ४६ | अंबरनाथ अग्निशमन दल | २६८२४०० |
| ४७ | कल्याण डोबिंवली अग्निशमन दल | २३१५१०१ |
| ४८ | बदलापूर अग्निशमन दल | २६९०८९० |
| ४९ | सर्पमित्र प्रकाश गोयल | ९३२४१५११५६ |
| ५० | सर्पमित्र राहूल कदम | ९५५२२३९२४३ |

(समीर उन्हाळे)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

जा.क्र.उमपा/आ.व्य्.वि./ २३ /२०२०
दिनांक :- २३/०५/२०२०

## कार्यालयीन आदेश

नैसर्गिक आपत्तीच्या वेळी घ्यावयाची काळजी व त्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भात महानगरपालिकेत नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येत आहे. आपात्कालीन नियंत्रण कक्षामध्ये मा. आयुक्त यांचे अधिपत्याखाली नियंत्रण कक्ष प्रमुख श्री. बाळासाहेब नेटके, मुख्य अग्निशमन अधिकारी , सर्व सहायक आयुक्त यांची नियुक्ती करण्यात येत आहे. तसेच नियंत्रण कक्षातील सर्व माहिती संकलित करून शासनास माहिती पाठविणे , तसेच आपात्कालीन नियंत्रण कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांचे वेतनपत्रक तयार करणे व इत्यादी कामकाज श्री. संदीप आसेकर सहा. अग्निशमन केंद्र अधिकारी यांनी काम करावे.

सदर आदेश त्वरीत अंमलात येत आहे.

(समीर उन्हाळे)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत:-

१) सर्व संबंधित कर्मचारी/अधिकारी
२) सर्व प्रभाग अधिकारी
३) सर्व विभाग प्रमुख
४) निवड नस्ती

# उल्हासनगर महानगरपालिका

## नैसर्गिक आपत्ती नियंत्रणासाठी वाहन व्यवस्था

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | जबाबदार अधिकारी |
|---|---|---|
| १ | जे.सी.बी. | वाहनविभाग प्रमुख |
| २ | डंपर | वाहनविभाग प्रमुख |
| ३ | पोकलीन मशिन | वाहनविभाग प्रमुख |
| ४ | ॲम्ब्युलंस | वाहनविभाग प्रमुख |
| ५ | जीप | वाहनविभाग प्रमुख |
| ६ | शव वाहिनी | वाहनविभाग प्रमुख |
| ७ | इतर वाहन | वाहनविभाग प्रमुख |
| ८ | फायरव्हॅन | मुख्य् अग्निशमन अधिकारी |
| ९ | मिनी हायड्रोलिक प्लॅटफॉर्म | कार्यकारी अभियंता (विद्युत) |

(समीर उन्हाळे)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## संभाव्य पुरग्रस्त ठिकाणे व सुरक्षित स्थळे व नियंत्रण अधिकारी

| अ.क्र. | पुरग्रस्त ठिकाणी | सुरक्षित स्थळ | नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | राजीव गांधी नगर, कॅम्प नं.१<br>गुलशन नगर, कॅम्प नं. १<br>क्रांती नगर. कॅम्प नं. १ | दुनिचंद कलानी.<br>बी.एड कॉलेज.<br>उल्हासनगर-१ | (१) श्री. संदिप जाधव, उप अभियंता<br>गोल मैदान – २७२०१४४<br>२७२१३९<br>(२) श्री. तरूण सेवकानी. कनिष्ठ अभियंता<br>(३) संबंधीत स्वच्छता निरीक्षक |
| | धोबी घाट, संभाजी नगर, कमला नेहरू नगर | सेंच्युरी रेयॉन हायस्कुल | संबंधीत कनिष्ठ अभियंता<br>संबंधीत स्वच्छता निरीक्षक<br>गोल मैदान – २७२०१४४ |
| २ | रमाबाई आंबेडकर नगर | म.न.पा. शाळा क्र. १८ व २४ | संबंधीत कनिष्ठ अभियंता<br>संबंधीत स्वच्छता निरीक्षक<br>पप्पु गार्डन – २५५३३४० |
| ३ | सम्राट अशोक नगर, रेणूका सोसायटी<br>पहूलमल कंपाउंड, आयोध्या नगर, खन्ना कंपाउंड, पंचशीन नगर, शांति नगर सुभाष नगर, फर्स्ट गेट, गौतम नगर, सी ब्लॉक्, करोतिया नगर, सी ब्लॉक | धरम पाल दबार<br>जसलोक हायस्कुल<br>शांतिग्राम विद्यांमदिर<br>मनपा शाळा क्र. ९ | (१) संबंधीत कनिष्ठ अभियंता<br>(२) संबंधीत स्वच्छता निरीक्षक स्वच्छता निरीक्षक<br>व्ही.टी.सी. – २७२०१४६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मनपा शाळा क्र. ८<br><br>मनपा शाळा क्र. १७ | |
| ४ | लेप्रसी कॉलनी. साईबाबा नगर | उल्हास विद्यालय | संबंधीत कनिष्ठ अभियंता<br><br>संबंधीत स्वच्छता निरीक्षक |
| ५ | भरत नगर, वीर तानाजी नगर | तक्षशिला विद्यालय,<br>दुनिचंद कलानी<br>हायस्कुल कॅम्प नं. ५ | संबंधीत कनिष्ठ अभियंता<br><br>संबंधीत स्वच्छता निरीक्षक |

( समीर उन्हाळे)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

## <u>आरोग्य विभाग</u>

**मुददा :- पावसाळा सुरु होण्यापूर्वी शहरातील लहान मोठे नाले सफाई करणेबाबत...**

पावसाळयात अतिव्रष्टीमुळे शहरात पूर स्थितीजन्य परिस्थिती निर्माण होवू नये म्हणून महानगरपालिका दरवर्षी शहरातील लहान मोठे नाले सफाईंची कामे हंगामी रोजंदारी मजूर कामावर ठेवून तसेच मोठे नाले सफाईची कामे प्रोक्लेन मशीनदवारे करुन घेण्याचे काम हाती घेतले आहे.

चालू वर्षात सन २०२० शहरातील लहान-मोठे नाले सफाईसाठी महापालिकेने खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली असून सर्व नाले सफाईची कामे जून अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येतील.

२) शहरातील ४१ मोठे नाले सफाईसाठी जून पासून ०५ प्रोक्लेन मशीन, ०३ जे.सी.बी. व दररोज अंदाजे ३०० ते ३५० सफाई कामगार

(अ) इएक्स – ६०, (ब) इएक्स – १०० (१००), इएक्स – २००, प्रोक्लेन मशीन कामावर ठेवुन नाले सफाईची कामे हाती घेतलेली आहेत.

पावसाळयात शहरात साथरोग उदभवून नये म्हणून किटकनाशक औषधांची फवारणी करण्यासाठी पुरेसा किटकनाशक औषंधाचा साठा महापालिकेने उपलब्ध करुन ठेवलेला आहे.

(समीर उन्हाळे)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका
## आरोग्य विभाग

**साथरोग - नियंत्रण कृती आराखडा**

उन्हाळ्यात व पावसाळ्यात दूषित पाण्यामुळे होणारे साथीचे रोगांचे नियंत्रणासाठी उल्हासनगरमहानगरपालिकेतर्फे खालील प्रमाणे व्यवस्था करण्यात आली आहे.

**साथरोग नियंत्रण कक्ष:**

**जबाबदार अधिकारी** - डॉ.सुहास मोहोळकर वैद्यकीय आरोग्य अधिकारी
**कर्मचारी** - श्रीमती पौर्णिमा भिंगे , परिचारिक ,
**वाहन** - ॲम्बुलन्स

**दूरध्वनी क्रमांक** - २७२०१०८
**जोखीम ग्रस्त भागाची नावे**
१)भूषण नगर२) शहाड फाटक ३) रमाबाई नगर
४) हनुमान नगर ५) अशोक नगर६) सुभाष नगर
७) रेणुका सोसायटी ८) गौतम नगर ९) चोपडा कोर्ट
१०) शांतीनगर हिरा११) धोबीघाट १२) मौया नगरी
१३) नगर भिम कॉलनी १४) महात्मा फुले नगर१५) नेहरु नगर
१६) संजय गांधी नगर १७) करतीया नगर १८) प्रबुद्ध नगर

**3) उपचार व्यवस्था:**साथ रोगाच्या उपचारासाठी मध्यवर्ती रुग्णालय व शासकीयप्रसूतिगृह येथे उपचाराकरिता वेगवेगळ्या कक्षाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच नागरी आरोग्य केंद्र क्रमांक १ ते ६ या ठिकाणीसुद्धा उपचाराची सोय आहे.

४) **औषध साठा:**उल्हासनगर महापालिका मध्यवर्ती रुग्णालय व शासकीय प्रसूतिगृह नागरी आरोग्य केंद्र याठिकाणी औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

5) **पाणी नमुना तपासणी** : नियमितपणे शहराच्या वेगवेगळ्या भागातून पाणी नमुने तपासणी करिता पाठविण्यात येतात व दूषित नमूने आढळल्यास योग्य कार्यवाही करण्यात येते.
**नळ गळती** शोधणे व दुरुस्ती पाणीपुरवठा विभागातून नळगळत्या आढळून आल्यास ताबडतोब दुरुस्त करणेत येते. परिसर स्वच्छता बाबत योग्य ती काळजी घेण्यात येते तुंबलेली तसेच बंद गटारे साफ करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे.

(समीर उन्हाळे )
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

**ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION**

# उल्हासनगर महानगरपालिका

**फॅक्स् नं : ०२५१ २७२०१०४ विस्तार क्रं २०४ दुरध्वनी - २७२०१९६**


जा.क्र.उमपा/आ.व्य्.वि./ २४ /२०२०
दिनांक : २३ /०५/२०२०

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, ठाणे
तथा निवासी उप जिल्हाधिकारी, ठाणे

**विषय :- उल्हासनगर महापालिका नैसर्गिक आपत्ती क्रती आराखडा - २०२०**
**संदर्भ :- आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडील दिनांक १८/०५/२०२० रोजीचे पत्र.**

महोदय,

नैसर्गिक आपत्ती व त्यावर करावयाची उपाययोजना संदर्भात या कार्यालयाने तयार केलेल्या कृती आराखडयाची प्रत या पत्रासोबत माहितीसाठी पाठवित आहेत.

आपला,

(समीर उन्हाळे)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

# ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION
# उल्हासनगर महानगरपालिका

**फॅक्स् नं : ०२५१ २७२०१०४ विस्तार क्रं २०४ दुरध्वनी - २७२०११६**


जा.क्र.उमपा/आ.व्य्.वि./ २५ /२०२०
दिनांक : २३ /०५/२०२०

प्रति,

१) उप विभागीय अधिकारी
उल्हासनगर

२) मा. तहसिलदार
उल्हासनगर

३) पोलीस उप आयुक्त्
परीमंडळ – ४
उल्हासनगर – ३

४) सहा. पोलीस आयुक्त्
पवई कार्यालय, उल्हासनगर – ३

५) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य् विद्युत मंडळ,
उल्हासनगर – ३

**विषय :- नैसर्गिक आपत्ती कृती आराखडा – २०२०**

**संदर्भ :- आपत्ती व्यवस्थापन केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडील दिंनाक २१/५/२०२० रोजीचे पत्र.**

महोदय,

नैसर्गिक आपत्ती व त्यावर करावयाची उपाययोजना संदर्भात या कार्यालयाने तयार केलेल्या उल्हासनगर महानगरपालिका कृती आराखडयाची प्रत या पत्रासोबत माहितीसाठी पाठवित आहेत. कृपया स्विकार व्हावा ही विंनती.

आपला,

(समीर उन्हाळे)
आयुक्त्
उल्हासनगर महानगरपालिका

# ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

## उल्हासनगर महानगरपालिका

फॅक्स् नं : ०२५१ २७२०१०४ विस्तार क्रं २०४ दुरध्वनी - २७२०१९६


जा.क्र.उमपा/आ.व्य्.वि./ २६ /२०२०
दिनांक : २३ /०५/२०२०

प्रति,

..........................................................

..........................................................

..........................................................

..........................................................

**विषय :- उल्हासनगर महापालिका नैसर्गिक आपत्ती कृती आराखडा – २०२०**

नैसर्गिक आपत्ती व त्यावर करावयाची उपाययोजना संदर्भात या कार्यालयाने तयार केलेल्या उल्हासनगर महानगरपालिका कृती आराखडयाची प्रत या पत्रासोबत माहितीसाठी पाठवित आहेत. कृपया स्विकार व्हावा ही विंनती.

उप-आयुक्त् (मुख्या तथा आ.व्य् वि)
उल्हासनगर महानगरपालिका

# ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

## उल्हासनगर महानगरपालिका

**फॅक्स् नं : ०२५१ २७२०१०४ विस्तार क्रं २०४ दुरध्वनी - २७२०१९६**


जा.क्र.उमपा/आ.व्य्.वि./ २७ /२०२०
दिनांक : २३/०५/२०२०

प्रति,
मा. प्रधान सचिव,
नगरविकास विभाग (नवि-२०),
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२

**विषय :- उल्हासनगर महानगरपालिका नैसर्गिक आपत्ती कृती आराखडा – २०२०**

महोदय,

उपरोक्त् संदर्भिय विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे पावसळयापूर्वी करावयाची कामे आपत्कालीन व्यवस्थापन व त्यावर कार्यालयाने केलेली उपाययोजनेबाबत केलेल्या कृती आराखडयाची प्रत या पत्रासोबत माहितीसाठी पाठवित आहे. कृपया स्विकार व्हावा ही विनंती.

आपला,

उप-आयुक्त् (मुख्या तथा आ.व्य् वि)
उल्हासनगर महानगरपालिका

सोबत :- वरीलप्रमाणे

# उल्हासनगर महानगरपालिका

जा.क्र.उमपा/आ.व्य्.वि./ २८ /२०२०
दिंनाक :- २२/०५/२०२०

## कार्यालयीन आदेश

शासनाच्या निर्देशानुसार नैसर्गिक आपत्तीच्या वेळी घ्यावयाची काळजी व त्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भात महानगरपालिकेत आपत्त्कालीन नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पावसळयापूर्वी उल्हासनगर शहरातील धोकादायक बांधकामे, इमारतीचे सर्वेक्षण करून त्यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे नोटीस बजावणे आवश्यक आहे. यास्त्व आपणांस आदेशित करण्यात येते की, आपल्या अधिनस्त् कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांचेमार्फत उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करून त्यांचाप अहवाल उप आयुक्त् (अ.बां.नि.वि) व सहाय्यक आयुक्त्, प्रभाग क्षेत्र समिती यांचेकडे सादर करावा.

शहर अभियंता यांचेकडून धोकादायक इमारतींबाबत अहवाल प्राप्त् झाल्यानंतर सहाय्यक आयुक्त्, प्रभाग समिती यांनी अशा बांधकामांना नोटीसा बजावून नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही पार पाडावी.

सदर कारवाई दिंनाक १/६/२०२० पूर्वी करून तसा अहवाल न चुकता सादर करावा.

(समीर उन्हाळे)
आयुक्त्
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति :-

१) श्री महेश सितलानी, शहर अभियंता
२) सर्व सहाय्यक आयुक्त्
३)सर्व उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
४) सर्व कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग व अ.बां.नि. विभाग
५) सर्व विभाग प्रमुख
६) निवड नस्ती

प्रत :- अ.बां.नि. विभाग यांना माहितीसाठी उचित कार्यवाहीसाठी रवाना

ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

उल्हासनगर महानगरपालिका

फॅक्स् नं : ०२५१ २७२०१०४ विस्तार क्रं २०४ दुरध्वनी - २७२०१९६

जा.क्र.उमपा/आ.व्य्.वि./ २९ /२०२०
दिनांक : २३ /०५/२०२०

प्रति,
सर्व सहा. आयुक्त्,
प्रभाग समिती क्रं १,२,३ व ४,
उल्हासनगर महानगरपालिका,
उल्हासनगर

**विषय :- नैसर्गिक आपत्तीबाबत दैनंदीन अहवाल सादर करणेबाबत**

महोदय,

उपरोक्त् विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील नैसर्गिक आपत्ती विषयक नेमणूक करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडून केलेल्या कामाच्या कार्यवाहीचा अहवाल दररोज मा. उप-आयुक्त् (आव्यवि) यांचेकडून सादर करावा.

शासनास माहिती कळविण्यास सुलभ होईल.

(समीर उन्हाळे)
आयुक्त्
उल्हासनगर महानगरपालिका

ULHASNAGAR MUNICIPAL CORPORATION

उल्हासनगर महानगरपालिका

फॅक्स् नं : ०२५१ २७२०१०४ विस्तार क्रं २०४ दुरध्वनी - २७२०११६

जा.क्र.उमपा/आ.व्य्.वि./ ३० /२०२०
दिनांक : २३/०५/२०२०

प्रति,
मा. मुख्य् कार्यकारी अधिकारी,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, ठाणे
तथा निवास उप जिल्हाधिकारी ठाणे

**विषय :- मान्सून — २०२० पूर्व तयारी आढावा बैठक**

**संदर्भ :- क्रं साशा/जिआप्राठा/नियत्रंण कक्ष/आ.व्य्. आ.अ./२०२० दिंनाक १७/०५/२०२०**

महोदय,

उपरोक्त् संदर्भित विषयान्वये उल्हासनगर महापालिकेमार्फत पावसळयापूर्वी करावयाची कामे आपत्कालीन व्यवस्थापन, व त्यावर कार्यालयाने केलेली उपाययोजनेबाबत केलेल्या प्रारूप कृती आराखडयाची प्रत या पत्रासोबत माहितीसाठी पाठवित आहेत.

आपला,

(समीर उन्हाळे)
आयुक्त्
उल्हासनगर महानगरपालिका

सोबत :- वरीलप्रमाणे